2

रजि.नं. पी.एन.ए./एच.एस.जी./६५८/३१-१-१९७१

# पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्था (मर्यादित)

कार्यालय : पत्रकारनगर, सिंधू इमारत, पुणे ४११ ०१६.

**सभासदांच्या माहितीसाठी / २९.०५.२०२१**

पत्रकार नगर पुनर्निर्माण योजनेची माहिती देण्यासाठी इमारतीनुसार सभासदांच्या बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. ४ मे ते १० मे २०२१ च्या दरम्यान या सभा आयोजित करण्यात आल्या त्यास बहुसंख्य सभासदानी अगत्यपूर्वक उपस्थिती नोंदविली.पंच समितीने केलेला अभ्यास, गोळा केलेला तपशील व कागदपत्रे या विषयी सभासदानी समाधान व्यक्त केले. आता फार काळ न दवडता ही योजना त्वरीत मार्गी लावावी.काही सभासदानी हेतुतः असहकाराची भूमिका घेतली तर त्याना वगळून देखील योजना आखण्याचा व पुनर्निर्माण पूर्ण करण्याचा विचार करावा असे मत सभासदानी व्यक्त केले.कोणालाहि वगळून, डावलून, अथवा न्याय्य अधिकार नाकारुन काही करण्याचा पंच समितीचा अथवा पत्रकार नगर मधील बहुसंख्य सभासदांचा कोणताहि इरादा नाही हे पंच समितीच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.महाराष्ट्र शासनाने लागू केलेल्या एकात्मिक विकास नियमानुसार (यूडीसीपीआर) पत्रकार नगरमध्ये मिळू शकणारा एफएसआय , सहकार विभागाच्या निर्देषानुसार करावयाचे कामकाज व करावयाचे ठराव या संबधी सभासदाना बैठकीत सविस्तर माहिती देण्यात आली.एफएसआयचे वाटप कसे करणार, प्रत्येक सभासदास किती जादा जागा मिळेल, फ्लॅटचे आकारमान काय असेल, फ्लॅटच्या एका प्रकारातून दुसऱ्या प्रकारात स्थलांतर करता येईल का, शक्य असेल तर जादा फ्लॅट विकत घेता येईल का, पार्किंगची जादा किती असेल, नव्याने होणाऱ्या इमारतीत आपला फ्लॅट सभासदाना निवडता येईल का, पुनर्निर्माणात सभासदाना व्यक्तिगत खर्च किती येईल, प्रकल्प ठरलेल्या वेळेतच पूर्ण व्हावा या साठी काय दक्षता घेण्यात येणार आहे असे प्रश्न सभासदानी बैठकीत विचारले त्याची समाधानकारक उत्तरे देण्याचा प्रयत्न पंच समितीकडून करण्यात आला.पत्रकार नगरच्या जागेचा भोगवटादार वर्ग बदलण्यासंबंधी करावयाचे कामकाज व त्याची असणारी निकड या संबंधी सर्व सभासदाना पत्रकाव्दारे अगोदरच कळविण्यात आलेले आहे.सभासदांचे सहकार्यहि या योजनेसाठी लागणार आहे .त्या साठी सभासदानी

१) पुनर्निर्माण योजनेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यासाठी शासकीय अथवा स्थानिक प्राधिकरणाच्या पॅनलवरील आर्किटेक्ट यांची नावे त्यांचा पत्ता व काम स्वीकारण्यास तयार असल्याचे मान्यता पत्र व अपेक्षित फी या सह दि. १५ जून २०२१

पर्यत सभासदानी पंच समितीस लेखी कळवावी.या तारखेनंतर येणाऱ्या नावांचा विचार केला जाणार नाही.

२) पुनर्निर्माण योजनेचे विकसक म्हणून ज्यांच्या नावाचा विचार करावा अशा संभाव्य विकसकांची नावे,त्यांचा पूर्व इतिहास,अगोदर केलेली कामे ,आर्थिक व तांत्रिक क्षमता,व्यवस्थापनाची विश्वासार्हता या सह पंच समितीस १५ जून २०२१ पर्यत लेखी कळवावी.

३) सभासदांनी आपल्या वास्तवदर्शी योजना,सूचना व शिफारसी लेखी स्वरुपात पंच समितीकडे पाठवाव्या

पुनर्निर्माणासंबंधी कोणाला अधिक माहिती हवी असल्यास अथवा व्यक्तिगत चर्चा करायची असल्यास पचसमिती सभासद **दि ७ ते ११ जून २०२१** या काळात **रोज सकाळी ११ ते १** या वेळात समाज मंदिरात भेटू शकतील.या वेळे शिवाय भेटायचे असल्यास संबंधिताना फोन करुन व वेळ निश्चित करुन भेटता येईल.पुनर्निर्माणासंबंधी सभासदांच्या मनात कोणतीहि शंका राहू नये व गैरसमज होऊ नये या साठी हा प्रयत्न करण्यात येणार आहे. आपल्या सर्वाचे सहकार्य त्या साठी मिळावे ही विनंती

**पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्थे करिता**

विजय सावंत

अध्यक्ष

ॲड. विजय सावंत , विनायक पटवर्धन, प्रदीप नेवाळकर, विजय लेले, अनंत बेदरकर,

राजाराम जोशी ,ॲड.अनंत शालिग्राम, श्रीमती अरुंधती भिडे, श्रीमती मृदुला कुलकर्णी